# किस्से गदिमांचे

गजानन दिगंबर माडगूळकर - गदिमा, सुधीर फडके - बाबूजी आणि पु.ल. देशपांडे - भाई किंवा नुसतंच पु.ल. या त्रयीचं २०१८-२०१९ हे जन्मशताब्दी वर्ष. हे तिघं म्हणजे महाराष्ट्र संस्कृतीला पडलेलं एक सोनेरी स्वप्न आहे. मराठी चित्रपटसृष्टीतही त्यांनी इतिहास घडवला असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये. तिघांचंही लहानपण अतिशय कष्टात, हालात गेलं. परंतु स्वत:जवळ असलेल्या देवदत्त प्रतिभेने त्यांनी मराठी माणसाच्या मनांत मानाचं स्थान मिळवलं. आणि आजही ते स्थान ध्रुवताऱ्यासारखं अढळ राहिलेलं आहे. ह्या तिघांबद्दल लिहायचं म्हटलं तर एक मोठा ग्रंथच होईल. म्हणून मग मी ह्या लेखात फक्त गदिमांच्या बद्दल लिहायचं ठरवलं.

गदिमांबद्दल लिहिण्याचं नक्की केल्यानंतर मनांत अनेक प्रश्न उभे राहिले. त्यांच्याबद्दल लिहिण्यासारख्या असंख्य गोष्टी आहेत. त्यांचं जीवन चरित्र, त्यांचे सिनेमे, त्यांनी लिहिलेली गीते, चित्रपट गीते आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यांचं “गीतरामायण”. ह्या सगळ्याचा आढावा घ्यायचा म्हटलं तरी एका छोट्या लेखात ते शक्य नाही. मग भरपूर विचारांती मी “किस्से गदिमांचे” असं मनाशी ठरवून ह्या महान कवीला आदरांजली वाहण्याच्या मिषाने हा लेख लिहायचा ठरवले. अर्थात् गदिमांचे किस्से लिहिताना त्यांचे जीवश्च कंठश्च मित्र सुधीर फडके अर्थात् बाबूजी आणि पु.ल. ह्यांची हजेरी ह्यात नक्कीच लागणार ही मनाशी खूणगाठ होतीच.

औंध संस्थानातल्या माडगूळ नावाच्या खेड्यात बाबा बामण म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या कारभाऱ्यांचा दिगंबरपंत हा एकुलता एक मुलगा. त्यांना सर्व रावसाहेब म्हणत. बाबा बामण हे वेळी अवेळी गर्जना करणारं बलदंड व्यक्तिमत्व होतं. तर रावसाहेब मात्र भलतेच मवाळ होते. आपला नातू तरी आपल्यासारखा दणकेबाज व्हावा अशी बाबांच्या मनाला आस होती. रावसाहेबांना पहिली मुलगी झाली. दुसरा मुलगा झाला. पण तो पाळण्यातच गेला. तिसऱ्या अपत्याचा जन्म त्याच्या आजोळी म्हणजे औंध संस्थानातल्याच माडगूळपासून चार-पाच मैलांवर असलेल्या शेटफळे इथे झाला. मुलगा झाला, पण जन्मला त्यावेळी तो निश्चेष्ट होता. त्याला मृत समजून मग परसदारी ‘निजवून’ टाकण्याची तयारी चालली होती. अचानक सुईणीच्या मनांत काय आले, कुणास ठाऊक! तिने बाजेखालच्या शेगडीतले चार निखारे तव्यावर घेतले आणि मुलाच्या बेंबीजवळ नेले. त्याबरोबर ते मृत वाटलेले अर्भक रडू लागले. बाबा बामणचा हा नातू - रावसाहेबांचा मुलगा म्हणजेच गजानन दिगंबर माडगूळकर अर्थात् गदिमा. तर

सांगायची गंम्मत म्हणजे गदिमांच्या जन्माची ही कथा - जी सगळ्यांनाच माहीत आहे ती कथा म्हणजे सुद्धा एक किस्साच आहे.

बाबा बामणाचा नातू म्हणून गावकरी गदिमांचे खूप लाड करत. नवसासायासाचा पोरगा म्हणून घरीही त्यांचे लाड होत. एक लाडवलेला आणि खोडकर मुलगा म्हणून गदिमांनी लहानपणी नाव कमावले. आईने त्यांना गावच्या शाळेत घालायचा अनेकदा प्रयत्न केला. पण गदिमांनी त्याला दाद दिली नाही.

माडगूळ, आटपाडी, कुंडल असे वडिलांच्या बदलीच्या गावी ते आईवडिलांसोबत राहिले. उत्तम अक्षर काढणारा मुलगा म्हणून कुंडलच्या शाळेत त्यांची ख्याती झाली. ते मॅट्रिकच्या परीक्षेला बसले. पण गणित विषयाने त्यांना दगा दिला. झाले शिक्षण हेच फार झाले असे त्यांच्या मनाने घेतले. म्हातारे वडील, आजारी - अशक्त आई, घरात पाठच्या भावंडांची वाढलेली संख्या.. आणि घराची चिघळलेली आर्थिक परिस्थिती पाहून या सर्वांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे या विचाराची टोचणी गदिमांना लागली. याच दरम्यान देशासाठीही आपण काहीतरी करावे या विचारानेही ते झपाटले होते. देशभक्तीची धुंदी चढली होती. त्यांना 'हुतात्मा' व्हायचं होतं. पण म्हणजे नक्की काय करायचं, याच्या निश्चित कल्पना त्यांच्या मनाशी नव्हत्या.

औंध विद्यापीठातील मुख्याध्यापक भा. वि. काळे सरांची चिठ्ठी घेऊन गदिमा कुंडल सोडून बाहेर पडले. ते बऱ्यापैकी नकला करत असत. आचार्य अत्र्यांकडे जाऊन त्यांना भेटून सिनेमात कुठे वर्दी लागते का हे गदिमा आजमावणार होते. अत्र्यांकडे त्यांनी उमेदवारी केली. जेवणा-खाण्याचा प्रश्न तात्पुरता सुटला. अत्र्यांनी मला यशाचा दरवाजा उघडून दिला असे कृतज्ञतेचे उद्‌गार पुढे गदिमांनी काढले. आचार्य अत्र्यांच्या मुळे मास्टर विनायक यांच्याशी ओळख होऊन गदिमांचा सिनेसृष्टीत प्रवेश झाला. चित्रपटांत विविध नगण्य भूमिका त्यांना मिळाल्या. नकलाकार औंधकर म्हणून सेटवर ओळख मिळाली होती. पण नुसतीच उमेदवारी होती, पैसे मिळत नव्हते. पण पुढे बाबूराव पेंढारकरांमुळे, गदिमांनी केलेल्या भूमिकेचा मोबदला म्हणून त्यांना थोडे फार पैसे मिळू लागले. गदिमांमधील हुषारी, त्यांची काव्यप्रतिभा बाबूरावांनी ओळखली. त्यांनी गदिमांना हाताशी धरलं. त्यांच्याकडून चित्रपट गीतं लिहून घेतली. गदिमांचा सिनेसृष्टीतला शिरकाव आणि गीतकार म्हणून ओळख याचा हा असा किस्सा आहे.

सुधीर फडके आणि गदिमा यांची ओळख केवळ योगायोगाने झाली. तो किस्सा असा की बाबूजींचा एक बालमित्र माधव पातकर यांनी एका दर्यागीताला चाल लावून देण्याची बाबूजींना विनंती केली.

बाबूजींनी त्या गीताला सुरेख चाल लावली. ती गदिमांना ऐकवण्यासाठी ते पातकरांबरोबर गेले. तंबाखूच्या अडत दुकानाचा एखादा जाडजूड व्यापारी असावा तशा देहाचे जाडजूड गृहस्थ पाहून बाबूजींना हे कवी असावेत असं वाटलं नाही. पण गदिमा बोलायला लागले आणि मग मात्र बाबूजींचं देहभान हरपलं. पहिल्या भेटीपासून त्या दोघांची जोडी जमली. काव्यातले विविध प्रकार एकच व्यक्ती इतक्या चांगल्या तऱ्हेने लिहू शकते हा बाबूजींना नवीनच अनुभव होता.

गदिमांच्या भारदस्त देहाबरोबरच दुसऱ्यावर हुकूमत गाजवणाऱ्या त्यांच्या सहज स्वभावामुळे इतर सर्वांच्यापेक्षा ते वेगळे वाटत. “या माणसाला स्वत:च्या मोठेपणाची जाणीव आहे. ते एकदम कुणावरही रागावतात. पण थोड्याच वेळात राग शांत झाल्यावर खेळीमेळीने वागतात. या माणसाविषयी सर्वांच्या पोटी आदर आहे.” ही बाबूजींची गदिमांविषयी झालेली पहिल्या काही दिवसांतली प्रतिक्रिया होती.

गदिमा आणि बाबूजींचे तर अनेक किस्से  आहेत. गदिमा गाणी लिहिताना कधी अडत नसत. पण त्यांचा देशस्थी आळस कधी कधी त्यांच्या प्रतिभेच्या आड येई. असा त्यांनी कधी आळस केला की बाबूजी त्यांना दम देत. “तुम्हाला जमत नसेल तर मला सांगा. मी फटाफट गाणी लिहून टाकीन. पण मग आपल्या पोटावर पाय आला अशी ओरड माझ्या नावानं करू नका.” महाराष्ट्राच्या वाल्मिकीला असा दम द्यायचा अधिकार बाबूजींनी अगदी थोड्याच दिवसात मिळवला होता. त्या दोघांचे मैत्रीचे धागेच असे घट्ट गुंफले गेले होते. “गीत रामायण”मुळे फडके-माडगूळकर हे एक जोडनावच होऊन गेलं. फडक्यांच्या मधुर स्वरात घोळलेले माडगूळकरांचे तितकेच मधुर शब्द घराघरात घुमू लागले. पावसाच्या सरी सारखी माडगुळकरांची कविता आणि त्या सरीला सोनेरी रंग देणारा श्रावणातल्या उन्हासारखा फडक्यांचा स्वर. पण दोघांमध्ये टिंगलटवाळीही भरपूर चाले.

बाबूजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या घोष पथकात होते. गदिमा त्यांना म्हणत, “खरंतर हा बॅन्डवाला व्हायचा. पण ह्याच्या नरड्यात साखर असल्यामुळे हा गायक झाला.” ह्यावर गप्प बसतील तर ते बाबूजी कसले? तेही टोला लगावीत. ते गदिमांना म्हणत, “खरे म्हणजे हा कारकून व्हायचा. ह्याचे अक्षर चांगले आहे. पण देवाचे देणे असल्यामुळे हा कवी झाला.”

शारदापीठाच्या शंकराचार्यांनी सुधीर फडके यांना ‘स्वरश्री’ ही पदवी देऊन गौरविले. मात्र ‘गीतरामायण’चं सारं श्रेय फडके महाराष्ट्राचे वाल्मिकी म्हणून ज्यांचा गौरव केला त्या गदिमांना देतात.

आणि गदिमा सारं श्रेय प्रभूरामचंद्रांच्या चरणी अर्पण करतात. असा हा दोन जिवलग मित्रांमधला जिव्हाळा उलगडणारा किस्सा.

तरीही ‘गीतरामायण’च्या अभूतपूर्व यशाचं थोडं फार श्रेय सीताकांत लाड यांनाही द्यायला हवं. ‘गीतरामायण’ची निर्मिती हाही एक किस्साच आहे. सीताकांत लाड आणि गदिमा मुंबईला श्रीकृष्ण बोर्डिंगमध्ये एका लहानशा खोलीत एकत्र रहात होते. त्यानंतर लाड यांची बदली काही काळ नागपूरला आणि नंतर पुण्याला झाली. पुणे आकाशवाणी केंद्र त्यावेळी नुकतंच स्थापन झालं होतं. तिथे काहीतरी नवीन उपक्रम राबवावा या विचाराने सीताकांत लाड गदिमांच्या घरी पंचवटी बंगल्यावर आले. त्यांनी आपली कल्पना गदिमांपुढे मांडली. वाल्मिकीने गाईलेली रामकथा गदिमांनी राम जन्मापासून गीतबध्द करायची. गदिमांनी लाडांच्या या कल्पनेला होकार दिला.

१९५५ च्या रामनवमीपासून पुणे आकाशवाणीवरून ‘गीत रामायण’ला सुरुवात करायची आणि १९५६ च्या रामनवमीला हे रामायण संपवायचे. गदिमांपुढे हे एक मोठे आव्हान होते. गीत रामायणाचा आराखडा त्यांनी आपल्या डोळ्यासमोर उभा केला, आणि हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले.

श्री. रामचंद्रांच्या अश्वमेघ यज्ञासाठी अयोध्येत माणसांचा महासागर जमला आहे. त्यांच्या यज्ञमंडपात प्रभू रामरायाचे पुत्र तापस वेशधारी असे येतात आणि आपल्या पित्याच्या चरित्राचे गायन करीत असतात. अशा 'फ्लॅशबॅक' पद्धतीने गदिमांनी आपल्या रामायणाला सुरुवात केली आहे. ‘गीतरामायण’ हे मराठी भाषेला पडलेलं दिव्य स्वप्न एका रामनवमीला सुरू झालं आणि दुसऱ्या रामनवमीला संपलं. गदिमांचे शब्द आणि बाबूजींचे स्वर यांच्या संगमावर श्रोत्यांना वर्षभर स्नान करण्याचं पुण्य लाभलं. एक शब्दसृष्टीचे ईश्वर तर एक स्वरसृष्टीचे. गदिमांचे शब्द आणि बाबूजींचा स्वर ही बरसात महाराष्ट्रावर वर्षोगणती होत राहिली. ‘गीतरामायण’नं शब्द सुरांचं अव्दैत लोकांच्या ध्यानी आणून दिलं. “युगायुगांतून जन्माला येणारी ही मोठी माणसं!” असे उदगार मधूसूदन कालेलकरांनी त्यावेळी काढले.

हा खास किस्सा सांगायलाच हवा - गीतरामायणच्या रूपानं एक चमत्कार घडला. एकाच कवीनं केलेली रचना आणि एकाच संगीतकारानं संगीतबध्द केलेली गीते असा आकाशवाणीच्या इतिहासातील हा एकमेव संगीत कार्यक्रम ठरला. पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्रांनी गीताची आगाऊ प्रत मागवून दर

शुक्रवारच्या अंकात फुलांच्या चौकटीत ते छापण्याचा प्रघात ठेवला. तर श्रोत्यांनी गल्लोगल्ली रेडिओसेटला गंधाक्षता व फुले वाहून उदांच्या सुवासात सामूहिक श्रवण केले.

आचार्य विनोबा भावेंनी गीत रामायणातील गीते ऐकली. त्यांनी तुळसीदासाच्या आणि वाल्मिकीच्या रामाची वैशिष्ठ्ये सांगितली आणि ते गदिमांना म्हणाले, “माडगूळकर, तुमचा राम मराठी आहे.” यातील शेवटच्या गीताने विनोबांचे डोळेही अश्रूंनी डबडबले होते. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी गदिमांना ‘महाराष्ट्र वाल्मिकी’ ही पदवीच बहाल केली.

गदिमांना पुष्कळ मानसन्मान मिळाले. गोवा येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, ग्वाल्हेर येथील नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद, मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्षपद त्यांना लाभले. सरकारने “पद्मश्री” देऊन त्यांचा सत्कार केला. “विष्णुदास भावे सुवर्णपदक”, करवीर विद्यापीठाकडून “कवी भास्कर” ही पदवी, यवतमाळ इथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद गदिमांना मिळाले. हे सर्व सन्मान म्हणजे “गीतरामायण”च्या रचनेनंतर काव्याच्या प्रांतातील त्यांच्या योगदानाबद्दल साहित्यिक जगताने त्यांना दिलेली पावती होती. हे गदिमा जाणून होते, म्हणून त्यांच्याबद्दलचे किस्से सांगताना या सन्मानांचा उल्लेख करणे गरजेचे वाटते.

गदिमा आणि पुलंची मैत्रीही अशीच खूप जुनी. या दोघांच्या मैत्रीचेही अनेक किस्से आहेत ‘वंदे मातरम’ चित्रपटात आग्रह करून गदिमांनी पुलं आणि सुनीताबाईंना भूमिका करायला लावली होती. ‘गुळाचा गणपती’ हा चित्रपट सबकुछ पुलं असा होता, पण त्यातली गीते मात्र गदिमांनी लिहिली होती हे कदाचित फार कमी जणांना माहिती असेल. ‘देवबाप्पा’ चित्रपटातील गाजलेले बालगीत जे आजही सगळ्यांच्या ओठावर आणि आठवणीत अजूनही आहे त्या गीताचा खास किस्सा म्हणजे पुलंनी गदिमांना ‘नाच ग घुमा, कशी मी नाचू’ या धर्तीवर बालगीत लिहून द्यायचा द्यायला सांगितले. गदिमांनी लगेच ‘नाच रे मोरा आंब्याच्या वनात, नाच रे मोरा नाच’ हे गीत लिहीले.

गदिमा आणि पुल बऱ्याच साहित्यिक कार्यक्रमांना बाहेरगावी एकत्र जात असत. त्यावेळी कधी कधी रात्री भोजनापूर्वी रसपानाचा कार्यक्रम होत असे. सुरवातीला भिडेखातर पुलं नको म्हणायचे. त्यावेळी गदिमा पुलांची चेष्टा करत आपल्या बरोबरच्या मित्रांना म्हणत, “अरे याला कोणीतरी डोंगरे बालामृत आणून द्यारे.”

गदिमांनी ए.क. कवडा या टोपण नावाने बिंगचित्रं लिहिली. त्यात पुलं बद्दल ते लिहितात -

"पाया पडती राजकारणी, करणी ऐसी थोर

मराठीतला तू बिनदाढीचा रवींद्र टागोर"

एकमेकांची चेष्टा करत असले तरी गदिमा आणि पुल या दोघांमध्ये प्रेम, जिव्हाळाही तेवढाच होता. या प्रेमाचा किस्सा सांगायचा झाला तर 'कल्याणचा खजिना' या चित्रपटासाठी गदिमांनी पुलंच्या भागीदारीत पटकथा संवाद लिहिले आणि त्यात त्यांना कसलाही कमीपणा वाटला नाही

ज्ञानेश्वर-तुकाराम यांची प्रासादिक भावपूर्ण परंपरा आणि शाहिरी काव्याचा रांगडा रंगेलपणा याचा सुरेख प्रीतीसंगम गदिमांच्या वाणीत आणि लेखणीत आला होता. त्यांच्याकडे प्रतिभा होती आणि सिनेमाचं तंत्र त्यांना कमालीबाहेर जमलं होतं. त्यामुळे त्यांनी सिनेक्षेत्रात 'माडगुळकर युग' निर्माण केलं. त्याचा किस्सा सांगायचा म्हणजे गदिमा गंमतीने म्हणत, "मी लिहिलंय तसा नुसता कॅमेरा फिरवलात तरी चित्रपट होऊन जाईल." आपल्या सामर्थ्याची त्यांना जाणीव होती.

'संत निवृत्ती ज्ञानदेव' या चित्रपटाच्या वेळचा एक किस्सा - या चित्रपटाला सी. रामचंद्र यांचे संगीत होते. ज्ञानेश्वरांचीच वाटेल अशी ओवी त्यांना चित्रपटात पाहिजे होती. त्यांनी गदिमांना तशी ओवी लिहून देण्यास सांगितले. गदिमांनी ताबडतोब

"नवल वर्तले गे माये उजळला प्रकाशु

मनाचिये अंधाराचा होतसे विनाशु!"

ह्या ओळी लिहून दिल्या. ज्ञानेश्वरांच्या शैलीचा सखोल अभ्यास असल्याशिवाय आणि ती मनावर पूर्ण विंबली असल्याशिवाय अशी ओवी बाहेर पडणे शक्य नाही. चित्रपटातील ही ओवी ज्ञानेश्वरांची नसून ती गदिमांनी लिहिली आहे ही गोष्ट ज्यांना माहित नाही ते ह्यावर विश्वासही ठेवणार नाहीत.

संगीत, कथा, पटकथा, संवाद लेखन व गीतरचना या क्षेत्रात गदिमांच्या व बाबूजींच्या बरोबरीनं नवी नवी नावं पुढे यायला लागली असली तरी गदिमांना चित्रपट सृष्टीत जवळ जवळ इंद्राचं राजपद प्राप्त झालेलं होतं.

‘आराम हराम है’ या चित्रपटाच्या वेळचा एक किस्सा - या चित्रपटाची कथा, संवाद कालेलकरांचे होते. गीते गदिमांची होती आणि संगीतकार होते सुधीर फडके. चित्रपटातील शेवटच्या गीताच्या वेळी गदिमांची तब्येत बिघडली असल्याचा निरोप आला. बाबूजींनी मग कालेलकरांना गाणं लिहायला सांगितलं. कालेलकरांनी गाण्याचा मुखडा आणि अंतरा लिहिला. बाबूजींनी त्याला चाल लावली. एवढ्यात दारावरची घंटा वाजली. दार उघडून पहातात तर दारात गदिमा उभे! म्हणाले, “आज बरं वाटतंय म्हणून पुण्याहून आलो. तुमचं काम अडायला नको. काय सिच्युएशन आहे गाण्याची?” आता गदिमांना काय सांगायचं? त्यांचा स्वभाव शीघ्रकोपी. शेवटी बाबूजी धीर करून म्हणाले, “परवा रेकॉर्डिंग आहे. म्हणून कालेलकरांनी गीताचा मुखडा आणि अंतरा केला आहे.” गदिमा म्हणाले, “वा! ऐकवा की आम्हाला” कालेलकर हादरले. म्हणाले, ”त्या तबलजीची हातोडी तेवढी बाजूला ठेवा. कारण माझं काव्य ऐकल्यावर तुम्ही ती नक्कीच माझ्या डोक्यात हाणाल.” गदिमांनी त्यांना जवळ घेतलं आणि म्हणाले, “नाही रे, आता हे हात फक्त पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी राहिलेत.” कालेलकर गहिवरले. त्यांनी सुरू केलेलं गीत गदिमांनी पूर्ण केलं.

‘पहिला पाहुणा’ या चित्रपटासाठी गदिमांनी पहिली गीतरचना केली. त्यानंतर चित्रपटासाठी गीतरचना करताना त्यांनी मागे वळून पाहिलं नाही. अक्षरश असंख्य गीते या वीस-बावीस वर्षाच्या काळात त्यांनी लिहिली. या गीतांचा संग्रह ‘चैत्रवन’ या नावाने १९६१ च्या अखेर प्रसिद्ध झाला.

पौराणिक, कौटुंबिक, ऐतिहासिक, विनोदी, शाहिरी अशा सगळ्या प्रकारच्या चित्रपटासाठी गीतं - भूपाळी, स्तवने, समरगीते, ओवी, अभंग, लावणी, अंगाई गीते, ग्रामीण गीते, ठुमरी वजा बैठकीची गाणी, गझल, बालगीते हे सर्व प्रकार गदिमांनी हाताळले. सहजता, अकृत्रिमता हे गदिमांच्या लेखणीचे गुण आहेत.

गदिमा स्वभावाने मिष्किलही होते. त्याचा हा एक किस्सा – ‘अपराध मीच केला’ ह्या कालेलकरांच्या नाटकाला महाराष्ट्र सरकारचे लेखनाचे पहिले पारितोषिक मिळाले. दुसरा एक नाटककार त्यावेळी गदिमांना म्हणाला, “पहा किती पार्शालिटी आहे. माझ्या नाटकाच्या पाच आवृत्त्या निघाल्या. ह्या नाटकाच्या फक्त दोन. तरी त्या नाटकाला पहिले पारितोषिक मिळाले.” गदिमा त्या नाटककाराला मिष्किलपणे म्हणाले, ’आवृत्त्यांवर काही नाही हो. शनिमहात्म्याच्या आजवर दोनशे आवृत्त्या निघाल्यात.“ अशा प्रकारचे नर्म विनोद करून ते फुकट बढाया मारणाऱ्याला निरुत्तर करत.

गदिमा फार तापट स्वभावाचे होते हे तर सर्वश्रृतच आहे. पण पुढे पुढे ते मवाळ झाले. शांत झाले. आपल्या स्वभावातला बदल त्यांनीही जाणला. त्याबद्दल ते गंमतीनं म्हणायचे "साहित्यातली काय, चित्रपटक्षेत्रातली काय किंवा घरातली काय, माझी ठाकुरकी आता संपलेली आहे. माझं कुणी कुणी ऐकत नाही. मला कुरकुरायला काहीतरी कारण लागतं. कुरकुर इज माय हॉबी. तरीपण माझी आयाळ झडत चालली आहे. माझा नरसिंह अवतार संपलेला आहे." स्वत:च्या स्वभावाचं असं मार्मिक विश्लेषण करणाऱ्या ह्या महाकवीला त्यांच्या मिष्किलतेची दाद द्यायलाच हवी.

फुप्फुसाच्या कर्करोगाचे निदान होऊन गदिमांवर शस्त्रक्रिया करावी लागणार होती. ह्या अतिशय अवघड अशा शस्त्रक्रियेसाठी गदिमांना मुंबईच्या के.ई.एम्. रुग्णालयात दाखल केले होते. त्यावेळी आपण मृत्युशी भेट घेऊन परतीचा प्रवास कसा केला याचे समग्र वर्णन त्यांनी 'हॅलो मि. डेथ' ह्या लेखात केला आहे. शस्त्रक्रिया केल्यानंतर गदिमांना वॉर्डमधील खोलीत आणलं. त्यावेळचा हा किस्सा वाचून आपल्या अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. त्यांची शस्त्रक्रिया झाल्यानंतर चार दिवसांनी त्यांच्या रक्तवाहिन्यांमधील रक्तप्रवाह मंदावला. नाडीचे ठोके गवसेनासे झाले. डॉक्टरांची धावपळ झाली. ऑक्सिजन दिला गेला. त्यांचे थांबलेले हृदय पुन्हा चालू झाले. गदिमा लिहितात – "ह्या मधल्या काळात बहुतेक मी मरणाच्या दारात गेलो होतो. मला स्वत:ला ते दार दिसले नाही. महिषासुर यमधर्माचेही दर्शन मला झाले नाही. मला दिसला तो कालपुरुष. म्हणजे एक निराकार अंधार. ठार काळा. त्या अंधाराला कसलाही स्वर नव्हता. मीच त्याला ओळखून ओरडलो, "हॅलो मिस्टर डेथ!" त्या अंधारानेच माझ्याशी हस्तांदोलन केले असले पाहिजे. बर्फ जितका थंड असेल तितका तो स्पर्श थंड होता. त्या स्पर्शाने अवघे विश्वच कोसळून पडल्यासारखा धक्का मला जाणवला. माझ्या दहा बोटांची नखं काळी ठिक्कर पडली होती. बऱ्याच वेळानं मला जाणवलं की माझं मेंढरू मुक्त झालं आहे. मृत्युच्या मंदिरासमोर त्याला आता बळी जायचं नाही."

परंतु ऑपरेशन नंतर काही दिवस बरे गेले तरी त्यांची प्रकृती आता ठीक रहात नव्हती. मृत्युचे विचार त्यांच्या मनांत थैमान घालू लागले होते. ते त्यांच्या पत्नीला - विद्याताईंना म्हणाले, "मरण कुणालाच चुकलं नाही. पण मला असं वाटतं की मी जगाचा निरोप घेताना सन्मानपूर्वक घेतला पाहिजे."

गदिमांचे आपल्या आईवर नितांत प्रेम होते. आपल्या आईवर प्रदीर्घ कादंबरी लिहावी अशी त्यांची इच्छा होती. त्या कादंबरीचे नावही त्यांनी ठरवले होते – "जन्मदा". आपला मुलगा कविता करतो,

चित्रपटासाठी गीते लिहितो हे पाहून गदिमांच्या मतोश्रींना धन्यता वाटे. गदिमांनी रामकथा गीतात गुंफली ते गीतरामायण त्यांच्या मातोश्रींनी ऐकले. रामायणाची लोकप्रियता त्यांच्या कानी आली. त्यावेळी त्या गदिमांना म्हणाल्या, "गजानना, एक गीत रामायण लिहून दुसरे काही लिहिले नसतेस तरी चालले असते. वाल्मिकीने तरी रामायणाशिवाय दुसरे काय लिहिले?"

१९७६ साली बाबूराव पारखे यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ एक संस्था उभारली. त्या संस्थेमार्फत आदर्श मातांचा सत्कार करण्याची योजना आखली गेली होती. १४ डिसेंबर १९७७ ला गदिमांच्या मातोश्रींचा 'आदर्श माता' म्हणून सत्कार व्हायचा होता. गदिमांना अतिशय आनंद झाला होता. आई त्यांचं दैवत होतं. त्यांची तिच्यावर पराकोटीची भक्ती होती. ती कर्तुत्ववान होती. प्रपंचासाठी तिने अपार कष्ट उपसले होते. स्वत:च्या कवितेचे सारे श्रेय ते आपल्या आईला देत. जन्मभर आपल्या आईने कष्ट केले, खस्ता खाल्ल्या त्याचं चीज झालं असं त्यांना वाटलं. मातोश्रींच्या सत्कार सोहोळ्याला जायचं त्यांनी ठरवलं. मात्र गदिमांची तब्येत त्या दिवशी खूपच बिघडली होती. त्यांना थंडी भरली. ते समारंभाला जाण्याच्या परिस्थितीत नव्हते. पंडित महादेव शास्त्रींच्या हस्ते बनूताई माडगूळकरांचा - गदिमांच्या मातोश्रींचा सत्कार समारंभ चालू होता.

इकडे घरी गदिमांची तब्येत अधिकाधिक बिघडत गेली. डॉक्टर आले. त्यांनी सर्व उपचार केले. पण अखेर नियतीची इच्छा वेगळी होती. मातोश्रींचा सत्कार समारंभ झाला आणि पाठोपाठ गदिमा गेल्याचा फोन आला.

१४ डिसेंबर १९७७ ची संध्याकाळ असाच एक किस्सा बनून राहिली! सारी धडपड, सारे संघर्ष, सारे राग-लोभ लयाला गेले. सारा महाराष्ट्र गदगदला. गीतरामायणाच्या या आधुनिक वाल्मिकीने आपली इहलोकीची यात्रा संपवली आणि तो अनंताच्या प्रवासाला निघून गेला. त्यांच्याच गीतरामायणातल्या ओळी जनसागराच्या मनांत उचंबळत होत्या -

"पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा... दोष ना कुणाचा…"

---

**लीना माटे** Email - leenashining@gmail.com

---